स्थापना -२२ जून १९६० नोंदणी क्रं -२४०९५ RBI-L.No.-UBD/MH/956 P Date-31/12/1987

# डॉ आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि.जयसिंगपूर

## ६२वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदाकरीता)

डॉ आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि.जयसिंगपूर (ता.शिरोळ) या बँकेची सन २०२०-२०२१ ची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.२३/०९/२०२१ ई रोजी दुपारी ठिक ०१.३० वाजता, आभासी पध्दतीने (Online ऑनलाईन ) VC/OAVM व्दारे श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.दत्तनगर शिरोळ येथील सभागृहात खालील विषयावर विचार विनिमय करणेकरीता बोलविणेत आलेली असुन सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर ऑनलाईन उपस्थित रहावे,ही विनंती.

## ■ सभेपुढील विषय ■

१. मागील दिनांक २८.०१.२०२१ ई रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वैद्यानिक लेखापरीक्षकांनी सादर केलेला अहवाल,ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्वीकृत करणे.

३. सन २०२०-२०२१ या सालातील वैद्यानिक लेखापरीक्षक मे.ए.डी.शिंदे आणि कं यांचेकडून मिळालेला लेखापरीक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

४. सन २०२०-२०२१ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे.

५. मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१-२०२२ चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०२०-२०२१ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.

६. सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता वैद्यानिक लेखापरीक्षक नेमणुकीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व अनुषंगिक कार्यवाही करणे.

७. सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता अंतर्गत,कंकरंट व कर लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे

८. बँकेच्या मा संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकाना सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात दिलेल्या कर्जाची माहीती घेणे.

९. सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजूरी देणे

१०. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस रजा मंजूर करणेबाबत विचार करणे.

११. मे.अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार
श्री व्ही ए कदम
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ ः- जयसिंगपूर
दि.२६.०८.२०२१

---

विशेष सुचना ः

१) सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधुन मोबाईल क्रमांक,ई मेल आय डी,व्हॉटस अप सुविधा असलेला मोबाईल क्रमांकाची नोंद करावी किंवा https://agm.kolhapur.tv/JUSB2021.aspx या लिंक व्दारे रजिस्टेशन करावे.

२) सभेच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी सभासदांना त्याच्या मोबाईल क्रमांकावर मिटींगच्या अगोदर ४८ तास स्वतंत्र लिंक पाठविणेत येईल. सदर लिंकचा वापर करून आपण मिटींगमध्ये सहभागी होणेचे आहे. त्यानुसार आपली उपस्थिती ग्राहय धरली जाईल

३) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झालेस अर्ध्या तासानंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.

४) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या सुचना व बँकेच्या कामकाजासंबधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदांनी दिनांक.१८.०९.२०२१ पुर्वी बँकेकडे लेखी कळवावे.

५) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू.१०००/- झाली असुन ज्या सभासदांचे भागभांडवल अपुर्ण आहे त्यांनी ते पुर्ण करावे.

६) सभासदांनी आपला पत्ता बदलला असलेस नवीन पत्ता प्रधान कार्यालयाकडे त्वरीत कळवावा तसेच सभासदांनी आपल्या सर्व खात्याची के वाय सी आपल्या शाखेत जाऊन पुर्ण करावी अन्यथा के वाय सी अपुर्ण असलेने आपले खाते फिज करणेत येतील याची कृपया नोंद घ्यावी.

७) तीन वर्षावरील डिव्हीडंड जे सभासद दि.३१.१२.२०२१ पर्यत नेणार नाहीत अशा सभासदांचे डिव्हीडंड रिझर्व्ह फंडास वर्ग केले जाईल.

८) अहवालाच्या व हिशोब पत्रकाच्या प्रती प्रधान कार्यालयात व सर्व शाखा कार्यालय येथे सभासदांचे माहीतीसाठी ठेवणेत आलेल्या आहेत. तसेच www.jusbbank.com या वेबसाईट वर बँकेचा अहवाल पहावयास मिळेल.